महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.१/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
*मुंबई - ४०० ०१९.*

## प्रशासकीय परिपत्रक क्र. २५२ दिनांक ०१ / १० /२००९

**विषय** : महावितरण कंपनीमधील महिला कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रसुती रजेची मर्यादा १८० दिवसांपर्यंत वाढविण्याबाबत.

......

पुर्वीच्या म.रा.वि.मंडळ कर्मचारी सेवाविनियम क्र.५३ अन्वये कंपनीत कार्यरत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना प्रसुती रजेच्या प्रारंभापासून ९० दिवस सरासरी वेतनावरील रजा मिळणेबाबतची तरतूद करण्यात आली आहे. सदर रजेची मर्यादा शासन निर्णय क्र.अरजा-१४०९/प्र.क्र.८/०९/सेवा-०६ दि.२४.०८.२००९ च्या धर्तीवर १८० दिवसांपर्यंत वाढविण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. या अनुषंगाने सर्वंकष विचारांती व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (प्रकल्प), संचालक (संचलन) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून कर्मचारी सेवाविनियम क्र.५३ (क)(दोन) व क्र.५३ (ख) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

**सेवाविनियम क्र.५३ (क) (दोन)**

**दोन)** ज्या महिला कर्मचाऱ्यास, प्रसुती रजेचा अर्ज करण्याच्या तारखेस २ किंवा अधिक हयात मुले असतील ती महिला कर्मचारी प्रसुती रजा मिळण्यास अपात्र ठरेल.

**सेवाविनियम क्र.५३ (ख)**

**ख)** वरील पोटनियम (क) मधील तरतुदींची पुर्तता होत असल्यास सक्षम अधिकारी महिला कर्मचाऱ्यास प्रसुती रजेच्या प्रारंभापासून १८० दिवस सरासरी वेतनावरील रजेची मंजुरी देऊ शकेल, अशी रजा, रजेच्या हिशेबातून वजा केली जाणार नाही. त्या महिला कर्मचाऱ्याच्या प्रसुतीच्या संभाव्य तारखेबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र आणि प्रसुत झाल्यावर वैद्यकीय प्रमाणपत्रासह प्रसुतीची तारीख कळविण्यासंबंधीची तिचे प्रतिज्ञापत्र, प्रसुती रजेच्या अर्जासमवेत असलेच पाहिजे.

३. कर्मचारी सेवाविनियम क्र.५३ मधील इतर तरतुदी अबाधित राहतील.

४. प्रसुती रजेची वाढीव मर्यादा हे प्रशासकीय परिपत्रक जारी केल्याच्या तारखेपासून लागू राहील.

५. सदर परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

*( सु.य.पाटील )*
***मुख्य महाव्यवस्थापक (क)***

प्रत :
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार.

*D:\O&M\Adm.Cir.F.N.1-180 days M.Leave.doc*
*30/09/2009*